# राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती
संभाजीनगर,बचत भवन लेखा व कोषागार
कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर
-४३१००१

**तक्रार क्र. १०८३/२०१९-१६९/२०२०/छ.संभाजीनगर**
**(द्वितीय अपील क्र.५१३६/२०१८ (६) मध्ये)**

श्रीमती सुनिता एकनाथ मगरे, : तक्रारदार
रा.भुजंगेचा वाडा,एकतानगर,
जटवाडा रोड, हर्सूल,ता.
जि.छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा वार्ड अभियंता, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी

२. जन माहिती अधिकारी अधिकारी तथा आस्थापना अधिकारी, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी

३. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त (महसूल) महानगरपालिका,छत्रपती संभाजीनगर

## निर्णय

**(सुनावणी दि. १६.०५.२०२४)**

.तक्रारदार यांनी दि.१८.०७.२०१९ व दि.१५.०२.२०२० रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.त्यामध्ये "तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.

"अपील क्र.५१३६/२०१८(६) अतंर्गत संपूर्ण माहिती न मिळाल्यामुळे केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ व महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८२च्या अतंर्गत संबंधित अधिकारी यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. आणि तक्रारदारांना पूर्ण माहिती देणेबाबत आदेशीत करण्यात यावे अशी मागणी केली आहे."

आयोगाने द्वितीय अपील क्र.५१३६/२०१८(६)मध्ये दि.२२.१०.२०१८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले होते.

"वर्तमान जन माहिती अधिकारी यानी वर नमूद केल्याप्रमाणे माहितीची कार्यालयीन कामकाजाचा एक दिवस निश्चित करुन घेऊन अधिनियमातील कलम २ (त्र) (एक) नुसार पाहणी द्यावी व अपिलार्थी यांनी माहितीची पाहणी करुन वाजवी माहितीच्या प्रती चिन्हांकित करुन द्याव्यात व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेल्या काही माहितीच्या प्रती (५०पृष्ठे) हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात."

सदर प्रकरणावर यापूर्वी दि.२३.०४.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीला तक्रारदार श्रीमती सुनिता एकनाथ मगरे उपस्थित होत्या. तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (आस्था-२) महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांची निवडणुक कामी नेमणुक केली, असल्याने सुनावणीसाठी पुढील तारीख वाढविण्यात यावी, अशी विंनती पत्राद्वारे केली, त्यामुळे सदर प्रकरणात परिपूर्ण सुनावणी होण्यासाठी पुढील तारीख वाढवून देण्यात आली आहे.

त्यानुसार आज दिनांक १६.०५.२०२३ रोजी सुनावणी ठेवण्यात आली, सदरील सुनावणीवेळी तक्रारदार श्रीमती सुनिता एकनाथ मगरे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यावतीने त्यांचे प्रतिनिधी श्री.उदय मानवतकर सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर हे उपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी तक्रारदार यांनी केलेल्या युक्तिवादानुसार त्यांना व्दितीय अपील क्र.५१३६/२०१८(६) मधील निर्णयानुसार अदयापपर्यंत माहिती मिळाली नसल्याचे त्यांनी कथन केले, तसेच जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली किंवा नाही याबाबतचा पुरावा आयोगासमोर सादर केला नाही

उपरोक्त युक्तिवादवरुन असे स्पष्ट होते की, आयोगाच्या निर्णयाचे पालन झाले नसल्याचे दिसून येते. अधिनियमातील तरतुदीनुसार, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (७) नुसार आयोगाकडील निर्णय सार्वजनिक प्राधिकरणांवर बंधनकारक असुन अशा निर्णयाचे अनुपालन करणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही होण्यासाठी माहिती अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (८) (क) मधील तरतुदीनुसार जबाबदारी **अतिरिक्त आयुक्त -१ महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर** यांच्यावर निश्चित करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगाने आदेशित करुनही माहिती न देणे, आयोगाच्या आदेशाची अवहेलना करणे, अशा बाबी माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायदयाच्या उल्लंघन करणा-या ठरतात. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर हे अधिनियमातील कलम २०(२) च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरतात. त्यामुळे संबधित जन माहिती अधिकारी, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना याप्रकरणी त्यांना लागू असलेल्या प्रचलित सेवानियमांच्ये शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१).उपरोक्त विवेचनानुसार संबधित जन माहिती अधिकारी, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांच्यावर या प्रकरणात लागू असलेल्या प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२).तसेच सदर कारवाई करण्याची जबाबदारी उपरोक्त शिफारसीनुसार, माहिती अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (८) (क) व १९(७) अन्वये **आयुक्त तथा प्रशासक, महानगर पालिका छत्रपती संभाजीनगर** यांच्यावर निश्चित करण्यात येत आहे. यास्तव तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ छत्रपती संभाजीनगर सत्यमेव जयते

27.6.24

**( मकरंद रानडे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

तक्रार क्र.१०८३/२०१९-१६९/२०२०/छत्रपती संभाजीनगर जावक क्र. 10755/२०२४ दिनांक : 27/6/2024

प्रत: माहिती तथा कार्यवाही/अंमलबजावणीस्तव अग्रेषित.

१. संबधित जन माहिती अधिकारी, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांना **मार्फत :-** आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर
२. आयुक्त, तथा प्रशासक, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर
३. अतिरिक्त आयुक्त -१ महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर